ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3134. Licence No. 53.

वर्ष २८ पुणें, बुधवार तारीख १९ सप्टेंबर, १९६२ अंक १८

## विविध माहिती

**विजेच्या भारी यंत्रसामग्रीचे कारखाने**—विजेची भारी यंत्रसामग्री तयार करण्यासाठी मध्यवर्ती सरकारनें १२ खाजगी कारखानदारांना परवाने दिले आहेत. ह्यापैकी दोन कारखाने मद्रासमध्यें, दोन मुंबईमध्यें, आणि प्रत्येकी एक कारखाना कलकत्ता, बंगलोर व त्रिवेंद्रम ह्या शहरांतून काढण्यांत यावयाचा आहे. विजेच्या यंत्रसामग्रीसाठी येणारी मागणी व पुरवठा ह्यांचा विचार करून खाजगी कारखान्यांना परवाने देण्यांत आले आहेत.

**अधिक वेतनाची मागणी डावलली**—ब्रिटनमधील सरकारी नोकरांच्या लवाद-कोर्टानें १,५०,००० सरकारी नोकरांची अधिक वेतन मिळण्याविषयींची मागणी फेटाळून लावली आहे. ह्यापैकी ६७,००० नोकर कारकूनवर्गांतील आहेत. त्यांनीं पगारांत ३ टक्के वाढ देण्याची मागणी केली होती. ८४,००० कामगार पोस्टांतील एंजिनिअरिंग खात्यांत काम करणारे आहेत. त्यांनीं पगार दुप्पट करावा अशी मागणी केली होती.

**रेल्वेवरील वहातुकींत सुधारणा**—दक्षिण रेल्वे मार्गावरील मद्रास ते विजयवाडा आणि मद्रास ते एरोड ह्या भागावरील रेल्वेवहातुकींत सुधारणा करण्याची शक्यता रेल्वेबोर्ड अजमावून पाहात आहे. ह्यापैकी पहिल्या विभागावर वहातुकीची अतिशय गर्दी होत असते. हा मार्ग दुहेरी करण्याचें काम चालू आहे. त्याशिवाय वाहतूक व्यवस्थेंत कांहीं सुधारणा करण्याचेहि प्रयत्न करण्यांत येत आहेत.

**कामगारांसाठी इस्पितळ**—श्रीरामपूर ह्या ठिकाणीं कामगारांसाठी एक अद्ययावत् इस्पितळ बांधण्यांत येणार आहे. इस्पितळासाठी ६ लाख रुपये खर्च येणार आहे. ह्या रकमेपैकी बहुतेक रकम कामगारांनीं आपल्या वेतनांतून जमविलेली आहे. श्रीरामपूर येथील व्यापारी संघटनेचे अध्यक्ष श्री. खटोड ह्यांनीं इस्पितळासाठी १५,००० रुपयांची देणगी जाहीर केली आहे.

**एल्–अलामेन येथें वस्तुसंग्रहालय**—दुसऱ्या महायुद्धांत इजिप्तमध्यें एल्–अलामेन ह्या ठिकाणीं फील्ड मार्शल मॉंटगोमरी व जर्मनीचा मार्शल रोमेल ह्यांच्यांत निर्णायक युद्ध होऊन रोमेलचा पराभव झाला. ह्या युद्धांत ब्रिटिश व जर्मन लष्करांनीं जें युद्ध-साहित्य वापरलें त्यांचें एक वस्तुसंग्रहालय एल–अलामेन ह्या ठिकाणीं स्थापन करण्यांत येणार आहे.

**युरोपियन सामायिक बाजारपेठेला विरोध**—ब्रिटननें युरोपच्या सामायिक बाजारपेठेंत सामील न होता कॉमनवेल्थ राष्ट्रगटांतील देशांतील व्यापारी संबंध अधिक वाढविण्याचा प्रयत्न करावा, अशी मागणी लंडनमध्यें बाजारपेठेला विरोध करणाऱ्या मोठ्या निदर्शनांत करण्यांत आली.

**उत्तर प्रदेशांत डॉक्टरांचा तुटवडा**—उत्तर प्रदेशांत डॉक्टर्सचा तुटवटा असल्यानें राज्यांतील ३५० सरकारी दवाखान्यांतून डॉक्टर्सच नाहींत. उत्तर प्रदेशांतील डॉक्टर्स पंजाब व बंगाल राज्यांत जात असल्याची वार्ता आहे. ह्या राज्यांतील सरकारी डॉक्टर्सना मिळणारें वेतन व इतर सवलती उत्तर प्रदेशाच्या मानानें अधिक आहेत, असें कारण सांगण्यांत येत आहे. डॉक्टर्सच्या मेहनतान्यांत वाढ करण्यांत आली नाहीं, तर टंचाई अधिकच वाढण्याचा धोका आहे.

**विजापूर येथें लष्करी शाळा**—भारत सरकारनें विजापूर येथें एक लष्करी शाळा व विमानतळ बांधण्यासाठी ४० लाख रुपये मंजूर केलेले आहेत. हीं दोन्हीं कामें करण्यासाठी विजापूरच्या लोकांनीं कांहीं रक्कम गोळा करावयाची आहे. परंतु ती गोळा करण्याचे कामीं अद्याप फारशी प्रगति झालेली नाहीं. जरूर ती रक्कम गोळा करण्यांत अपयश आलें, तर सरकारी मदत रद्द होण्याची शक्यता आहे.

**मद्रासजवळ खताचा कारखाना**—मद्रासजवळ लवकरच काढण्यांत येणाऱ्या खताच्या कारखान्यांत दरसाल अर्धा लाख टन रासायनिक खत तयार करण्यांत येईल. हा कारखाना येत्या ऑक्टोबरमध्यें चालू होईल असा अंदाज आहे. कारखाना टप्प्यानें बांधण्यांत येत आहे. पहिल्या टप्प्यासाठी ५ कोटी रुपये खर्च येईल. दुसऱ्या टप्प्यांत उत्पादन दुप्पट करण्यांत येईल. कारखाना चालू झाल्यावर दरसाल २॥ कोटी रुपयांचें परदेशीय चलन वांचेल.

**विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्सची मागणी**—महाराष्ट्रांतील विदर्भ हा भाग औद्योगिकदृष्ट्या मागासलेला असल्यानें, ग्रामीण भागांत छोटे उद्योगधंदे काढण्याच्या कार्यक्रमांत त्याला अग्रहक्क देण्यांत यावा अशी मागणी विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्सनें भारताच्या नियोजन समितीकडे केली आहे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत छोट्या उद्योगधंद्यांच्या स्थापनेसाठी १५ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

**मिठाईच्या निर्यातीचें महत्त्व**—अहमदाबादमधील मिठाईच्या व्यापाऱ्यांच्या मतानें मिठाई निर्यात करून भारताला मोठ्या प्रमाणावर परदेशीय चलनाची प्राप्ति होऊं शकेल. कापड, वनस्पति तेल, इत्यादि पदार्थांच्या निर्यातींत घट होत असल्यानें परदेशीय चलन मिळविण्याच्या ह्या मार्गाला सरकारनें उत्तेजन द्यावें अशी सूचना त्यांनीं केली आहे. योग्य प्रकारची भारतीय मिठाई परदेशांत लोकप्रिय होईल असा विश्वास त्यांना वाटत आहे.

**मेट्टुर येथील वीजनिर्मिती केंद्र**—मेट्टुर येथें उभारण्यांत येत असलेल्या वीजनिर्मिती केंद्रांतील १,३५० फूट लांबीचा बोगदा खणण्याचें काम आतां पूर्ण झालें आहे. पुढच्या पावसाळ्यांत ह्या योजनेंतील ५०,००० किलोवॅट वीज निर्माण करणारा पहिला जनरेटर चालू करण्यांत येईल असा अंदाज आहे. विद्युत् निर्मितीची यंत्रसामग्री रशिआकडून घेण्यांत येणार असून तिची उभारणी रशिअन तज्ज्ञांच्या साह्यानें करण्यांत येणार आहे.

**लष्कराला लागणाऱ्या दारूवरील कर**—लष्करांतील लोकांना लागणाऱ्या दारूवर कर घेण्यांत येऊ नये अशी विनंती म्हैसूर सरकारला लष्करातर्फे करण्यांत आली होती. म्हैसूर सरकारनें ती अमान्य केली आहे. दारूवरील कर रद्द करण्यांत आल्यास सरकारचें उत्पन्न तर बुडेलच, पण शिवाय इतर राज्यांतील प्रथेविरुद्ध तें होईल असें सरकारचें म्हणणें आहे.

**तनखे कमी करण्यास विरोध**—पूर्वीच्या जयपूर संस्थानच्या राणासाहेब गायित्रीदेवी स्वतंत्र पक्षाच्या प्रतिनिधि म्हणून लोकसभेंत निवडून आल्या आहेत. संस्थानिकांचे तनखे बंद करण्याबद्दल करण्यांत येणाऱ्या सूचनांबाबत बोलतांना त्या म्हणाल्या कीं, त्यांच्या तनख्यांत कपात करणें अगर ते बंद करणें भारताच्या राज्यघटनेला सोडून होईल; गेल्या सार्वत्रिक निवडणुकींत सर्व संस्थानिकांनीं भाग घेतला असता तर त्यांना भरपूर बहुमत मिळालें असतें.

**सर्व सेवासंघाचा पाठिंबा**—अखिल भारतीय सर्व सेवासंघाच्या समितीची बैठक मदुरा येथें भरली होती. १९६५ नंतर हिंदीच्या बरोबरीनें इंग्रजीलाहि राजभाषा म्हणून मानण्यांत यावें ह्यासाठी भारताच्या राज्यघटनेंत दुरुस्ती करण्यांत येणार आहे. ह्या घटना-दुरुस्तीला पाठिंबा देणारा ठराव सर्व सेवासंघानें मंजूर केला आहे. घटना-दुरुस्तीमुळें भारताच्या कांहीं भागांतील लोकांना वाटणारी भीति नाहींशी होण्यास मदत होईल असें ठरावांत म्हटलें आहे.

**लोकसंख्येंत झपाट्यानें वाढ**—संयुक्तराष्ट्र संघटनेतर्फे प्रसिद्ध करण्यांत येत असलेले १९६१ चें लोकसंख्याविषयक वार्षिक नुकतेंच प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. वार्षिकांतील माहितीप्रमाणें जगाची लोकसंख्या आतां ३०० कोटी झाली आहे. १९५० पासून १९६१ पर्यंत लोकसंख्येंत एकशष्ठांश वाढ झालेली दिसून येतें. लोकसंख्येच्या वाढीचें सर्वांत अधिक प्रमाण मध्य-अमेरिकेंत आहे.

**इंडियन ऑईल कंपनीला तोटा**—सरकारी मालकीच्या इंडियन ऑईल कंपनीला १९६०–६१ च्या आर्थिक वर्षांत २·३ लाख रुपये तोटा आला होता. १९६१–६२ च्या आर्थिक वर्षांत कंपनीला १४ लाख रुपये तोटा येण्याचा संभव आहे. कंपनीजवळ तेलाचा साठा पडून राहिल्यामुळें आणि स्टेट ट्रॅन्सपोर्टसारख्या संघटनेकडूनहि तेल घेण्याबाबत अनुत्साह दाखविला गेल्यामुळें ही परिस्थिति उद्भवली आहे.

**अधिक साह्य मिळविण्याचे प्रयत्न**—भारताचे अर्थमंत्री श्री. मोरारजी देसाई वॉशिंग्टनला जाणार आहेत. ह्या मुक्कामांत ते भारत-साह्य-मंडळाकडून तिसऱ्या पंचवार्षिक योजनेसाठी अधिक मदत मिळविण्याचा प्रयत्न करतील. ह्या योजनेसाठी आतांपर्यंत १,८०० कोटी रुपयांची परदेशीय मदत मिळाली आहे. तथापि अजूनहि १,२०० कोटी रुपयांची मदत मिळविण्याची जरूरी आहे. भारत-साह्य-मंडळाची बैठक पुढील वर्षाच्या प्रारंभीं वॉशिंग्टन येथें भरणार आहे.

**मेरिनो लोकरीची नक्कल**—ऑस्ट्रेलियामधील मेलबोर्न येथील एक उद्योगपति आतिपूर्वेशीं व्यापार वाढविण्याच्या दृष्टीनें जपानला गेले होते. त्यांनीं जपानमधून एक प्रकारचा कृत्रिम धागा बरोबर आणला आहे. हा धागा ऑस्ट्रेलियांतील प्रसिद्ध मेरिनो लोकरीच्या धाग्यासारखा आहे. ऑस्ट्रेलियांतील लोकर-संशोधन संस्थेतर्फे आतां त्याची तपासणी करण्यांत येणार आहे.

**अमेरिकेला साखरेची निर्यात**—१९६२ सालें अमेरिकेला लागणाऱ्या साखरेंत २ लाख टनांची वाढ करण्याचा निर्णय अमेरिकेच्या शेतकी खात्यानें घेतला आहे. ह्या निर्णयास अनुसरून निरनिराळ्या देशांकडून घ्यावयाच्या साखरेच्या आयातींत वाढ करण्यांत आली आहे. भारताच्या वाट्यांत ४९७ टनांची वाढ करण्यांत आली आहे.

**इंडोनेशिअन वैमानिकांना शिक्षण**—एअर इंडिआ इंटरनॅशनलच्या 'नंगापर्वत' ह्या बोईंग ७०७ जेट विमानानें १३७ इंडोनेशिअन शिकाऊ वैमानिक जाकार्तीला रवाना झाले. हे वैमानिक शिक्षण घेण्यासाठी बंगलोरला आलेले होते. शिक्षण पुरें झाल्यावर त्यांना परत नेण्यासाठी इंडोनेशिअन सरकारनें 'नंगापर्वत' भाड्यानें घेतलें होतें.

**स्त्रियांच्या हक्कांची सनद**—नॅशनल फेडरेशन ऑफ इंडियन वुइमेन ह्या संघटनेची ४ थी काँग्रेस पुढील महिन्यांत दिल्ली येथें भरविण्यांत येणार आहे. सध्यांच्या आर्थिक व सामाजिक घडींत व कायद्यांत स्त्रियांवर अन्याय होत असल्यामुळें त्यांच्या हक्कांची व मागण्यांची एक सनद काँग्रेस तयार करणार आहे. स्त्रियांना समान संधि देण्याची मागणी करण्यांत येईल.

**मध्यप्रदेशांत नवी कोळसा-खाण**—भारताच्या राष्ट्रीय कोळसा-विकास मंडळानें मध्यप्रदेशांत एक नवीन कोळशाची खाण उघडण्याचें ठरविलें आहे. ह्या खाणीसाठी २ कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज करण्यांत आला आहे. खाणींत गुंतविण्यांत येणाऱ्या भांडवलावर ९·४ टक्के नफा सुटेल, असें सांगण्यांत येत आहे.

**इटलीमधील डॉक्टरांचा संप**—इटलीमधील सार्वजनिक इस्पितळांत काम करणारे डॉक्टर्स नुकतेच २४ तासांच्या संपावर गेले होते. अधिक वेतन मिळविण्यासाठी व कामाची परिस्थिति सुधारून घेण्यासाठी त्यांनीं हा संप केला होता. सुमारें २२,००० डॉक्टर्सनीं संपांत भाग घेतला होता. ह्यापूर्वीहि त्यांनीं २४ तासांचा संप एकदा केला होता.

**किरणोत्सर्गाच्या धोक्यावर उपाय**—अणुबाँबच्या स्फोटानंतर स्ट्रॉन्शिम ९० नांवाचें विषारी द्रव्य वातावरणांत पसरतें. तें मनुष्याच्या शरिरांत शिरल्यास हाडापर्यंत जाऊन रक्तपितीसारखा रोग निर्माण करतें. जपानमधील एका वैद्यकीय शास्त्रज्ञानें हें द्रव्य शरिरांतून बाहेर काढण्यासाठी एक औषध शोधून काढल्याचें समजतें. औषधें उंदरांना टोचल्यावर तें यशस्वी असल्याचें आढळून आलें.

**सोनें गोठविण्याच्या अफवेचा प्रताप**—भारत सरकार बँकांच्या सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील सोनें गोठविणार असल्याच्या वार्ता पसरल्यानें कांहीं दिवसांपूर्वी दिल्लीमधील हजारों नागरिकांनीं आपलें सोनें व सोन्याचे दागिने काढून नेले. सुमारें ८०,००० तोळें सोनें काढून नेण्यांत आलें, असा अंदाज आहे. ह्या धांवपळींत व घबराटांत केंद्र सरकारचे कांहीं बडे अधिकारीहि होते असें म्हणतात.

# अर्थ

बुधवार, ता. १९ सप्टेंबर, १९६२





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## अंतरिक्ष संशोधनाबाबत ब्रिटिश शास्त्रज्ञांची टीका

ब्रिटिश असोसिएशन फॉर दि ॲड्व्हान्समेंट ऑफ सायन्स ह्या संघटनेची वार्षिक परिषद् मँचेस्टर येथें भरविण्यांत आली होती. संघटनेचे अध्यक्ष सर जॉन कॉक्रॉफ्ट ह्यांनीं परिषदेंत शास्त्रीय संशोधनाला, विशेषत: अंतरिक्ष संशोधनाला, सध्यां जी दिशा लागलेली आहे, त्याबाबत आपले विचार प्रगट केले. ते म्हणाले कीं अमेरिका, रशिया आणि कॉमनवेल्थ राष्ट्रगट ह्यांनीं संपूर्ण निश:स्त्रीकरण हें आपलें ध्येय म्हणून मान्य केलें आहे. निश:स्त्रीकरणाचा प्रश्न सोडवतांना ज्या तांत्रिक अडचणी उत्पन्न होतील त्या सोडविण्याच्या कामीं शास्त्रज्ञांनीं व विशेष ज्ञान असणाऱ्यांनीं मदत करणें आवश्यक आहे. शास्त्रीय संशोधनांत गुंतविल्या जाणाऱ्या द्रव्याचा, मनुष्य जातीला फायदा मिळावयाचा असेल तर जगांत कांहीं किमान पातळीवर राजकीय स्थैर्य अवतरलें पाहिजे. असें झालें तरच शास्त्रीय शोधांचा उपयोग मनुष्याच्या कल्याणाकरितां करणें शक्य होईल. पण सध्यां मात्र परिस्थिति भीतीदायक आहे. गेल्या वर्षीं नव्या प्रकारच्या कांहीं बाँबसचा शोध लावण्यांत आलेला आहे. ह्या बाँबसच्या स्फोटामुळें केवळ उष्णतेनेंच २० ते ३० मैलांच्या टापूंतील सर्व वस्तूंचा नाश होऊं शकेल. ह्यावरून विनाशाच्या दिशेनें जग कसें धांवत आहे हें लक्षांत येतें. नियंत्रित व संपूर्ण निश:स्त्रीकरण घडवून आणण्याच्या मार्गांतील मुख्य अडचणी राजकीय स्वरूपाच्या आहेत; तांत्रिक नाहींत. म्हणून सर्व बड्या राष्ट्रांना खरीखुरी इच्छा असेल तर निश:स्त्रीकरण घडवून आणतां येईल. तसें झाल्यास ब्रिटनच्या व इतर दुर्दैवी देशांतील लोकांच्या तांतडीच्या गरजा भागविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर संपत्तिसाधनें उपलब्ध करून देता येतील.

सध्यां जें अंतरिक्ष-संशोधन करण्यांत येत आहे तें इभ्रतीसाठी आणि राजकीय हेतूसाठी करण्यांत येत आहे. संशोधनाची हीच दिशा चालू राहिली तर शास्त्रीय संशोधनाला विपरीत वळण लागल्याखेरीज राहाणार नाहीं. कारण अशा प्रकारच्या भलत्याच संशोधनाच्या कामासाठी शेंकडों शास्त्रज्ञांना व इंजिनिअर्सना कामाला जुंपले जाईल. चंद्रावर अगर मंगळावर मनुष्य धाडण्याच्या कामीं बड्या राष्ट्रांत सध्यां स्पर्धा चालू आहे. ही स्पर्धा कल्पनाशक्तीला उत्तेजन देणारी असली तरी ती एकांगी आहे हें विसरून चालणार नाहीं. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या खास मदत फंडाचे चालक मि. पॉल हॉफमन ह्यांनीं ह्यासंबंधीं व्यक्त केलेले विचार चिंतनीय आहेत. त्यांच्या मतानें अविकसित देशांचा आर्थिक विकास घडवून आणण्याला अग्रहक्क देण्याची अतिशय जरूरी आहे. अविकसित देशांतील लोकांचें दरडोई उत्पन्न दहा वर्षांत २५ टक्क्यांनीं वाढविण्यासाठी दरसाल २० लाख डॉलर्स भांडवलाची गुंतवणूक आवश्यक आहे. तशी ती केली गेली नाहीं तर हे देश भलत्याच कामांना प्राधान्य देण्यांत आल्याची तक्रार करतील; ह्या तक्रारीला न्याय्य उत्तरें देतां येणें कठीण आहे. येत्या पन्नास वर्षांच्या काळांत जगापुढें दोन अवघड प्रश्न उभे ठाकणार आहेत. मनुष्याच्या प्रजननक्षमेतवर नियंत्रण कसें ठेवावें हा पहिला प्रश्न आणि उत्पन्न होणाऱ्या नव्या तोंडांना पुरेसें अन्न कसें पुरवावें हा दुसरा प्रश्न. त्याकडे लक्ष देण्यांत आलें नाहीं तर खाद्यपदार्थांच्या निर्मितीपेक्षा लोकसंख्या अधिक वेगानें वाढत जाईल आणि त्याचे भीषण परिणाम होतील. सुदैवानें जीव-रसायनशास्त्रज्ञ आपल्या क्षेत्रांत चांगली प्रगति करीत आहेत. तथापि शुद्ध शास्त्र आणि त्याचा व्यावहारिक उपयोग ह्यांकडे अधिक लक्ष देण्यांत आलें पाहिजे.

---

## झेकोस्लोव्हाकिआंतील औद्योगिक प्रदर्शन

झेकोस्लोव्हाकिआंतील ब्रेनो ह्या ठिकाणीं एक औद्योगिक प्रदर्शन भरविण्यांत आलें आहे. प्रदर्शन २३ सप्टेंबरपर्यंत चालू राहाणार आहे. ह्या प्रदर्शनांत भारत सरकारनें अधिकृत रीत्या भाग घेतलेला नाहीं. कारण प्रदर्शनाचें आमंत्रण सरकारला फार उशिरा मिळालें. तथापि, ह्या आंतरराष्ट्रीय प्रदर्शनांत ५ भारतीय कारखाने भाग घेत आहेत. प्रदर्शनांत ४१ युरोपीय व इतर देशांनीं भाग घेतलेला आहे. एंजिनिअरिंगच्या धंद्यांतील यंत्रसामग्रीचा समावेश प्रदर्शनांत प्रामुख्यानें करण्यांत आलेला आहे. यांत्रिक हत्यारें, रासायनिक धंद्याला लागणारीं यांत्रिक साधनें, रस्ते करण्याची व घरें बांधण्याची यंत्रसामग्री, शेतीचीं अवजारें, इत्यादि यंत्रें प्रदर्शनांत ठेवण्यांत आलीं आहेत. भारत सरकार पुढील वर्षीं भाग घेणार आहे.

---

## कच्ची फिल्म तयार करण्याचा कारखाना

हिंदुस्थान फोटो फिल्म मॅन्युफॅक्चरिंग कंपनीचा पहिल्या वर्षाचा अहवाल लोकसभेला सादर करण्यांत आला. ही कंपनी सार्वजनिक मालकीच्या विभागांत काढण्यांत आली असून अजून तिच्या स्थापनेसंबंधीं प्राथमिक स्वरूपाचें कामच चालू आहे. कंपनीच्या कारखान्यांत प्रत्यक्ष उत्पादनास केव्हां प्रारंभ होईल तें अद्याप सांगतां येत नाहीं. ३१ मार्च १९६२ अखेर संपलेल्या १६ महिन्यांच्या काळांत कंपनीच्या कामावर ४० लाख रुपये खर्च करण्यांत आले आहेत. ह्यांपैकीं बहुतेक रक्कम इमारती व तंत्रज्ञांचें शिक्षण ह्या बाबींवर खर्च झालेली आहे. कारखाना फ्रान्सच्या सहकार्यानें काढण्यांत येत असल्यामुळें तंत्रज्ञांना फ्रान्समध्यें शिक्षण देण्यांत येत आहे.

---

## भूकंपपीडितांना सिनेमानटांची मदत

इराणमधील भूकंपपीडितांना मदत करण्यासाठी सिनेनटी नर्गीस व नट सुनीलदत्त तेहरानला गेले आहेत. वस्तुत: त्यांचें नातें पत्नी-पतींचें आहे. त्यांनीं काढलेला 'मदर इंडिआ' हा बोलपट इराणमध्यें दाखविण्यांत येणार असून उत्पन्न भूकंपपीडीतांच्या मदतनिधीला देण्यांत येईल. तेहरानमध्यें चित्रपट दाखविला गेला त्या वेळीं तिकिटविक्री जास्त व्हावी म्हणून त्या वेळा ते मुद्दाम हजर राहिले होते.

## लाल चीनच्या वैमानिक सामर्थ्याची प्रचीति

गेल्या वर्षी रशिआवर हेरगिरीसाठी भ्रमण करणारें अमेरिकेचें यू-२ विमान रशिआनें पाडलें. त्याचे परिणाम आंतरराष्ट्रीय राजकारणावर होऊन अमेरिका व रशिआचे संबंध आणखी तणावले गेले. आतां लाल चीननें राष्ट्रीय चीनचे यू-२ विमान आपल्या भूमीवर पाडल्याची बातमी आली आहे. लडाखमधील कांहीं हजार चौरस मैल प्रदेश चीननें आक्रमकरीत्या व्यापल्यामुळें भारताचे व चीनचे संबंध बिघडले आहेत. अशा परिस्थितींत यू-२ विमान पाडण्याची लाल चीननें केलेली कामगिरी अर्थसूचक ठरूं पाहात आहे. यू-२ हें विमान सामान्यत: ६० ते ७० हजार फुटांवरून उड्डाण करत असतें. तें खाली पाडण्यासाठी सामान्य लढाऊ विमानांचा उपयोग होत नाहीं. ज्या अर्थी विमान टिपण्यांत चीनला यश आलें आहे, त्या अर्थी जमिनीवरून विमानाचा वेध घेऊन ते पाडण्याइतकी चीनची लष्करी तयारी असली पाहिजे असा तर्क करण्यांत येत आहे. रशिआची वैज्ञानिक व तांत्रिक प्रगति लक्षांत घेतां इतक्या उंचीवरील विमान पाडण्याची त्याची करामत समजू शकते. पण चीन वैज्ञानिक व तांत्रिक प्रगतींत स्वत:च्या बळावर इतका पुढें जाणें असंभवनीय वाटतें. अर्थातच रशिआनें चीनला अद्यावत् लष्करी मदत पुरविण्याचें चालू ठेवलें असलें पाहिजे असा निष्कर्ष निघतो. तसें असेल तर भारताच्या दृष्टीनें ही चिंतेची बाब समजली पाहिजे. सध्यां भारत व रशिआ ह्यांच्यांत 'मिग' विमानें घेण्याबाबत बोलणीं चालू आहेत. तीं फलद्रूप झालीं तरी भारत-चीन ह्यांच्या लष्करी सामर्थ्यांत भारत वरचढ होईल, असें म्हणवत नाहीं.

## किरणोत्सर्जाच्या धोक्याबद्दल नवा इशारा

संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या शास्त्रज्ञांच्या गटानें अणु व हैड्रोजन बॉम्बच्या स्फोटामुळें मानवी जीविताला उत्पन्न होणाऱ्या धोक्यासंबंधीं पुन्हा एकदा इशारा दिला आहे. ह्या स्फोटामुळें उत्पन्न होणारी विषारी धूलीकणांची पातळी अद्याप धोकादायक झालेली नाहीं, असा दिलासाहि त्यांनीं दिलेला आहे. खुद्द निसर्गहि धोकादायक किरणोत्सर्ज करीत असतो असें सांगून ह्या नैसर्गिक किरणोत्सर्जांत अणुबॉंबच्या स्फोटामुळें झपाट्यानें भर पडत असल्यानें धोक्याची पातळी लवकर गांठली जाण्याची शक्यता त्यांनीं ध्वनित केली आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें, स्फोटामुळें उत्पन्न झालेले दूषित धूलीकण एकसारखे हळुहळु पृथ्वीवर पडत असतात असें नाहीं. एकदम मोठ्या प्रमाणावर पडण्याचा संभवहि दृष्टीआड करून चालणार नाहीं. युरोप आणि उत्तर अमेरिकेंत वसंत ऋतूंत किरणोत्सर्जाचें प्रमाण वाढण्याचा संभव आहे. गेल्या कांहीं वर्षांत रेडिअमचा उपयोग करण्यांत आलेल्या वस्तु मानवी जीवनांत स्थिर झालेल्या आहेत. टेलिव्हिजनचे सेट्स, रात्रीं दिसणारीं घड्याळें, क्ष-किरणाचीं उपकरणें, इत्यादि वस्तू आतां जगभर परिचयाच्या झाल्या आहेत. ह्या वस्तूहि थोड्याबहुत प्रमाणांत किरणोत्सर्ज करीत असतातच. त्यामुळें मनुष्याच्या आरोग्याला कांहींसा धोका पोंचत असतोच. आरोग्यरक्षणाच्या कामीं अलीकडे क्ष-किरणांच्या उपकरणांचा वापर वाढत चाललेला आहे. गर्भवती मातांनीं क्ष-किरणानें छायाचित्रें वारंवार घेण्याबाबत जागरूक राहावें असा सल्ला शास्त्रज्ञांनीं दिलेला आहे. आधुनिक जीवनांत आवश्यक समजल्या जाणाऱ्या वरील वस्तू न वापरणें अर्थातच शक्य कोटींतील नाहीं.

## मच्छीमारीच्या धंद्यासाठी बंदर

त्रिवेंद्रमपासून ९ मैलांवर मच्छीमारीच्या धंद्याला उपयोगी पडेल अशा प्रकारचें एक बंदर बांधण्यांत येणार आहे. ह्या बंदराच्या बांधकामाचा पायाभरणी समारंभ भारत सरकारचे अन्नमंत्री श्री. स. का. पाटील ह्यांच्या हस्तें करण्यांत आला. केरळच्या उत्तरे कडच्या किनाऱ्यावर अशींच आणखी दोन बंदरें बांधण्यांत येणार आहेत. केरळच्या किनारपट्टीवर मच्छीमारीच्या धंद्यावर उपजीविका करणारीं ३,५०० कुटुंबें आहेत. बंदरें बांधल्यामुळें मासे सांपडण्याचें प्रमाण वाढून दरसाल ८,००० टन अधिक मासे मिळूं लागतील अशी अपेक्षा आहे. बंदराचें बांधकाम टप्प्यानें पुरें करण्यांत येईल. पहिल्या टप्प्याला १·२२ कोटी रुपये खर्च येईल. एकूण खर्च ४ कोटींचा होईल.

## ग्रामीण भागांना पाणीपुरवठा

मध्यवर्ती सरकारच्या आरोग्यमंत्री डॉ. सुशिला नायर अहमदाबाद येथील रोटरी क्लबांत बोलतांना म्हणाल्या कीं, देशांतील अनेक खेड्यांत अद्याप पिण्याचें पाणी मिळण्याची व्यवस्था करण्यांत आलेली नाहीं. हा प्रश्न अल्पकाळांत सोडविला जाणें अगत्याचें आहे. पण तो पूर्णपणें सोडविण्यासाठी ९०० कोटी रुपये खर्च करावे लागतील.

## शेतीविषयक संशोधनांतील अडचण

आंतरराष्ट्रीय तांदूळ मंडळाची ८ वी बैठक कौलालंपूर येथें भरविण्यांत आली होती. परिषदेला भारतातर्फे डॉ. राम सुभागसिंग हजर राहिले होते. परिषदेंत भाषण करतांना ते म्हणाले कीं, भारतानें शेतीविषयक संशोधनाची पुनर्घटना केली आहे; परंतु संशोधन करण्यासाठी शास्त्रीय उपकरणांची आवश्यकता आहे. त्यासाठी सुमारें २ कोटी रुपये लागतील. ते परदेशीय हुंडणावळींच्या रूपानें मिळाले नाहींत तर संशोधनाचें काम करणें कठीण होईल.

## भारत-अफगाणिस्थान व्यापारी करार

भारत आणि अफगाणिस्थान ह्या देशांच्या दरम्यान एक नवा व्यापारी करार करण्यांत आला आहे. अफगाणिस्थान भारताला कच्चीं व कमावलेलीं कातडीं, ताजीं व सुकीं फळें, हिंग, औषधीवनस्पति, इत्यादि माल पुरविणार आहे. भारत चहा, ताग, इत्यादि माल पुरविणार आहे. सध्यां उभय देशांत दरसाल ५ कोटी रुपये मालाची देवाण-घेवाण होते.


## सातारा जिल्हा को-ऑपरेटिव्ह लॅण्ड मॉर्गेज बँक, लि., कराड.

### फक्त सभासदांकरतां वार्षिक सभेची

# नोटीस

सदर बँकेची २७ वी वार्षिक साधारण सभा कराड येथें बँकेच्या ऑफिसांत रविवार तारीख ३० सप्टेंबर १९६२ रोजीं दुपारीं ४ वाजतां भरणार आहे. त्या वेळीं ( १ ) मागील सभेचें प्रोसिडिंग वाचून कायम करणें, ( २ ) १९६१-६२ सालचा अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक मंजूर करणें, ( ३ ) १९६२-६३ सालाकरतां अंदाजपत्रक तयार करणें, ( ४ ) लोकल ऑडिटर यांची नेमणूक, ऑडिट वाचन, पोट नियम दुरुस्ती वगैरे कामांचा विचार होणार आहे. तरी सभासदांनीं सदर सभेस अवश्य हजर राहावें अशी विनंती आहे.

कराड,<br>दि. १०-९-१९६२. धोंडीराम दाजी पाटील (नांगरे)<br>चेअरमन.

## मध्यप्रदेशांतील रस्तेबांधणीचा कार्यक्रम

तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत जबलपूर विभागांत नवीन रस्ते व पूल बांधण्याचा कार्यक्रम मध्यप्रदेश सरकार हातीं घेणार आहे. ह्या कार्यक्रमासाठीं ३५ लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. त्यापैकीं १२॥ लाख रुपये पूलबांधणीवर खर्च व्हावयाचे आहेत. नवीन रस्ते बांधून झाल्यावर डाकू व दरोडेखोरीविरुद्धची मोहीम चालू ठेवणें अधिक सुलभ होणार आहे. सध्यां मध्यप्रदेशांतील दमो व सागर जिल्ह्यांत दरोडेखोरांची विशेष हालचाल आहे. हे जिल्हे दळणवळणाच्या बाबतींत मागासलेले असल्यानें दरोडेखोरांचा तलास लावून त्यांना पकडण्याचें काम बिकट होतें. चालू वर्षांत ९ पक्के रस्ते व एक पूल बांधण्याचें काम पुरें करण्यांत येणार आहे.

## रेल्वेचे मार्ग दुहेरी करणार

मध्यवर्ती सरकारचे रेल्वेखात्याचे उपमंत्री श्री. रामस्वामी ह्यांनीं अशी माहिती सांगितली आहे कीं कलकत्ता ते दिल्ली आणि कलकत्ता ते मद्रास ह्यामधील रेल्वेमार्ग दुहेरी करण्याचें कार्य पुढील कांहीं वर्षांत पूर्ण केलें जाईल. मालवाहतूक व प्रवासी वहातूक मोठ्या प्रमाणावर व त्वरित करता यावी म्हणून मार्ग दुहेरी करण्यांत येणार आहे. सध्यां विजयवाड्यावरून जाणाऱ्या रेल्वेमार्गानें रोज ६५० मालवाहू डबे जातात. मार्ग दुहेरी करण्याचें काम पूर्ण झाल्यावर रोज १,१०० मालवाहू डबे ह्या मार्गानें जाऊं शकतील. कलकत्ता ते मद्रास रेल्वेमार्ग दुहेरी करण्याचें काम ४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या मध्याच्या सुमारास पूर्ण होण्याची शक्यता आज वाटत आहे.

## नवीन एंजिनिअरिंग कॉलेज

मध्यवर्ती सरकारच्या शास्त्रीय संशोधन खात्याचे मंत्री प्रा. हुमायून कबीर ह्यांनीं कोझीकोडजवळ एका नवीन एंजिनिअरिंग कॉलेजाची पायाभरणी केली. ह्या प्रसंगीं बोलतांना ते म्हणाले कीं भारतामधील लोकसंख्येचें वाढतें दडपण आणि सुशिक्षितांची बेकारी ह्यांवर औद्योगीकरण हा एकच उपाय आहे, आणि औद्योगीकरण होण्यासाठी शास्त्रीय व तांत्रिक शिक्षण संस्थांची अतिशय जरूर आहे. केवळ राज्याचा मागासलेपणा उद्योगधंद्यांनीं हळूहळू नाहींसा होईल अशी आशा त्यांनीं व्यक्त केली. ह्या कॉलेजसाठी ३० लाख रुपयांची शिक्षणाचीं साधनें व उपकरणें ह्यांची जरूरी आहे. ही सामग्री किंवा त्यापैकीं अर्धी तरी सामग्री परदेशांतून आयात करावी लागणार आहे. परदेशीय हुंडणावळीची टंचाई असल्यामुळें आयात करणें अवघड जाणार आहे.

## भारतांत तोंडाच्या कॅन्सरमध्यें वाढ

जागतिक आरोग्य संघटनेच्या कॅन्सरविषयक शाखेचे प्रमुख डॉ. चॅकलिन मद्रास येथें बोलतांना म्हणाले कीं, भारतामधील लोकांना कॅन्सरच्या रोगाची फार भीति आहे. तंबाखू चघळणाऱ्या लोकांत ह्या रोगाचें प्रमाण अधिक आढळून येतें. जागतिक आरोग्य संघटनेनें कॅन्सरविषयींच्या संशोधनाचें व नियंत्रणाचें भारतामधील कार्य अधिक व्यापक करण्याचें ठरविलें आहे. भारतामध्यें तोंडामधील कॅन्सरचें प्रमाण वाढत चाललेलें आहे. जे लोक तंबाखू खातात त्यांच्या तोंडांत होणाऱ्या फोडांचें अगर व्रणांचें अधिक संशोधन करण्यांत येणार आहे. डॉ. चॅकलिन गेलीं ३ वर्षे भारतांत काम करीत आहेत.

## बुभुक्षित लोकांची अफाट संख्या

संयुक्त-राष्ट्र संघटनेच्या अन्न व शेतकी उपसंघटनेचे संचालक श्री. बी. आर. सेन ह्यांनीं अशी माहिती सांगितली कीं, मानव जातीच्या इतिहासांत कधींहि नव्हती एवढी मोठी बुभुक्षितांची संख्या आजच्या जगांत आहे. भुकेनें व्याकुळ असलेल्या लोकांची संख्या ३० ते ५० कोटींपर्यंत तरी आहे. जगाच्या लोकसंख्येशीं त्यांचें प्रमाण १० ते १५ टक्के पडतें. त्याशिवाय १०० ते १५० कोटी लोकांना अपुरा अगर निकस आहार घेऊन दिवस काढावे लागत आहेत. आजच्या जगांतील शास्त्रीय व तांत्रिक ज्ञानाची प्रगति प्रशंसनीय आहे. ह्या ज्ञानाचा कल्पकतेनें व स्थानिक परिस्थिति लक्षांत घेऊन वापर केला तर विकसनशील देशांतील ग्रामीण भागांत राहणाऱ्या लोकांच्या राहणीच्या मानांत क्रांतिकारक बदल घडवून आणतां येणें शक्य आहे.

## हिंदी विद्यार्थ्यांना अधिक शिष्यवृत्त्या

१९५९ मध्यें लंडनमध्यें भरविण्यांत आलेल्या कॉमनवेल्थ शिक्षण परिषदेंत शिष्यवृत्त्यांची एक योजना तयार करण्यांत आली होती. राष्ट्रगटांतील लायक विद्यार्थ्यांना ब्रिटनमध्यें येऊन अभ्यास करण्यासाठी त्या देण्यांत यावयाच्या होत्या. हुषार विद्यार्थ्यांना पदवीनंतरच्या अभ्यासासाठी देण्यांत येणाऱ्या १८८ शिष्यवृत्त्या लंडनमध्यें जाहीर करण्यांत आल्या. त्यांपैकीं सर्वांत जास्त म्हणजे ३८ शिष्यवृत्त्या हिंदी विद्यार्थ्यांना मिळाल्या आहेत. कॅनडांतील २४ विद्यार्थ्यांना, ऑस्ट्रेलियांतील २० विद्यार्थ्यांना, पाकिस्तानमधील १७ विद्यार्थ्यांना आणि नायजेरिआंतील १६ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या मिळाल्या आहेत. आपआपल्या देशांतील जीवनांत उपयोगी पडेल असें संशोधन त्यांनीं करावयाचें आहे.

## ऊंस-शेतकऱ्यांच्या परस्पर भेटी

इंडिअन सेंट्रल शुगरकेन कमिटीतर्फे उत्तरेमधील कांहीं प्रगतिपर ऊंस-शेतकऱ्यांनीं दक्षिणेंतील ऊंसमळ्यांना भेट द्यावी म्हणून योजना आंखण्यांत आली आहे. दक्षिणेंतील कांहीं शेतकरी उत्तर भारतामधील ऊंसमळ्यांनाहि भेटी देतील. उसाच्या लागवडीच्या सुधारलेल्या पद्धती परस्परांना माहीत व्हाव्या म्हणून हा उपक्रम सुरू करण्यांत येत आहे.

**खनिजांच्या निर्यातीसाठी रस्ते**—म्हैसूर राज्यांतील हॉस्पेट भागांत मँगेनिज व लोखंड सांपडतें. ह्या खनिजांची निर्यात करणें सोपें व्हावें म्हणून म्हैसूर सरकार हा भाग कारवार व मार्मगोवा बंदराला जोडणार आहे. त्यासाठीं एक मोठा राजरस्ता बांधण्याचा विचार चालू आहे.

**अमेरिकेची नवीन तोफ**—अमेरिकन लष्करी शास्त्रज्ञांनीं एक नवीन तोफ तयार केली आहे. ती वजनांत हलकी असल्यानें विमानांतून वाहून नेणें सोपें आहे. तोफ स्वयंचलित असून तिचा गोळा २० मैलांपर्यंत जाऊं शकतो. ४ फूट पाण्यांतून ती मार्ग काढूं शकते आणि ४०० मैल अंतरापर्यंत प्रवास करूं शकते.

**ब्रह्मदेश सरकारशीं करार**—ब्रह्मदेशाच्या क्रांतिकारक सरकारनें आर्थिक व तांत्रिक साह्य मिळविण्यासाठी रशियाबरोबर एक करार केला आहे. ह्या मदतीचा उपयोग करून मध्य ब्रह्मदेशांत शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठीं एक धरण बांधण्यांत येणार आहे.

### पंजाब राज्यांत घड्याळाचा कारखाना

पंजाब राज्यांत घड्याळाचा एक कारखाना काढण्यांत येणार असल्याचें राज्याचे मुख्यमंत्री श्री. प्रतापसिंग कैरों ह्यांनीं जाहीर केलें आहे. घड्याळें तयार करण्याचें काम शिकण्यासाठी राज्य सरकारनें १० स्त्री-कामगारांना बंगलोर येथील घड्याळाच्या कारखान्यांत पाठविलें होतें. पंजाबमधील कारखाना राज्याच्या राजधानीजवळच काढण्यांत येणार असून त्यांत बहुतेक सर्व काम स्त्रियांकडून करवून घेण्यांत येणार आहे. घडयाळें तयार करण्यासाठी लागणारी हाताची कुशलता स्त्रियांत विशेष आढळून येते, असा अनुभव आहे. पंजाब सरकार तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत तांत्रिक शिक्षणासाठी १३ कोटी रुपये खर्च करणार आहे. ह्या कार्यक्रमांत सुमारें १८,००० लोकांना तांत्रिक शिक्षण देऊन तयार करण्यांत येणार आहे.

### कॅन्सरच्या रोगावर नियंत्रण

जागतिक आरोग्य संघटनेच्या आरोग्यविषयक आकडेखात्याचे प्रमुख डॉ. लोगन ह्यांनीं अशी माहिती सांगितली कीं जगांत दरसाल ५० लाख लोकांना कोणत्यातरी प्रकारच्या कॅन्सरच्या रोगाची बाधा होते आणि त्यांतील २० लाख लोक तरी त्या रोगाला बळी पडतात. कॅन्सरच्या रोगाचें उच्चाटन करण्याच्या कामीं गेल्या कांहीं वर्षांत बरीच प्रगति करण्यांत आली आहे. ह्या रोगावर हमखास उपाय शोधून काढण्यांत लवकर यश येईल अशी आशा वाटूं लागली आहे. कॅन्सरचा रोग पूर्व युरोप व उत्तर अमेरिका ह्या भूभागांत अधिक प्रमाणावर आढळून येतो. कारण, तेथील लोकांची आयुर्मर्यादा लांब असते. आशिआ, आफ्रिका खंडांतील देशांत कॅन्सरचें प्रमाण त्या मानानें कमी आहे.

### मद्रासची निवड करण्याची सूचना

रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर श्री. अय्यंगार ह्यांनीं मद्रास येथील रोटरी क्लबपुढें भाषण करतांना मद्रास राज्यांत अणुशक्तीच्या साह्यानें वीज निर्माण करणारें केंद्र काढण्यांत यावें अशी आग्रहाची सूचना केली. ते म्हणाले कीं, मद्रास आणि पश्चिम किनाऱ्यावरील मुंबईसारखीं ठिकाणें ह्यांतील कारखान्यांना चांगल्या प्रतीचा कोळसा पुरविण्यासाठी फार खर्च येतो. शिवाय कधीं कधीं जरूर तितका कोळशाचा पुरवठा करतांहि येत नाहीं. म्हणून अशा भागाला अणुशक्तीवरील वीज-केंद्र उभारण्याच्या कामीं अग्रहक्क देण्यांत आला पाहिजे. अणुशक्तीवरील वीज-केंद्र चालविण्यासाठी आवश्यक असणारें तांत्रिक ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न आतांपासून करण्यांत आला पाहिजे. भारतामधील औद्योगिक शक्तीचा तुटवडा आणखी १० ते १५ वर्षें तरी टिकणार असल्याचें त्यांनीं सूचित केलें.

### उत्तर प्रदेशामधील बेकारांची संख्या

उत्तर प्रदेशाच्या विधान सभेत राज्याच्या तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमावर पांच दिवस चर्चा झाली. चर्चेला उत्तर देतांना राज्याचे नियोजनमंत्री म्हणाले कीं, उत्तर प्रदेश सरकारनें तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमावर ७०० कोटी रुपये खर्च करून २३ लाख नवे रोजगार उपलब्ध करून दिले. तरीसुद्धां राज्यांतील बेकारांच्या संख्येंत घट झालेली नाहीं. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस राज्यांतील बेकारांची संख्या सुमारें १८ लाख होती, ती तशीच राहिली आहे. आर्थिक जीवनाचें नियोजन करणें आवश्यकच आहे असें सांगून ते पुढें म्हणाले कीं नियोजनाच्या अभावीं गोंधळ माजल्याशिवाय राहणार नाहीं.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय.
विवाहकार्यांची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४

श्री. वा. काळे यांचीं दोन नवीं पुस्तकें
१ दाणे आणि खडे कि. रु. २=५०
२ कौटुंबिक हितगुज कि. रु. ३=००


५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान
★ सरदारगृह ★
प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

★ सुवर्ण-महोत्सवी वर्ष ★
महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., मुंबई
(दि विदर्भ सहकारी बँक लिमिटेड सम्मीलित)
मुख्य कचेरी— ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई टेलिफोन नं. २५५४७४-७५
विभागीय कचेरी— महाल-नागपूर तारेचा पत्ता— फार्मर बँक
: बृहन्मुंबईतील शाखा :
(१) भायखळा (२) गोरेगांव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्ले (७) सांताक्रूझ
: नागपूर विभागांतर्गत शाखा :
(१) सिताबर्डी (२) अमरावती (३) चांदा (४) मलकापूर (५) खामगांव (६) बुलढाणा
चेअरमन : श्री. प्रा. ध. रा. गाडगीळ
ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरी वर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखर कारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | रु. | ३ कोटी, ६० लाख |
| गंगाजळी व फंड | रु. | १ कोटी, ४ लाख |
| ठेवी | रु. | १९ कोटी, १० लाख |
| खेळतें भांडवल | रु. | ५४ कोटी, ८६ लाख |

*महाराष्ट्र राज्यांत सर्वत्र शाखा व संलग्न बँका आहेत.*
भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.
चिं. द. दाते,
कार्यकारी संचालक.

## जनता सहकारी बँक लि., सांगलीचे संस्थापक व सध्यांचे चेअरमन



श्री. मल्लिकार्जुन सातप्पा कराळे

"स्वतःला विसरून तूं जनसेवा कर" या उक्तीप्रमाणें श्री. कराळे-अण्णा यांचें जीवन चालू आहे. एकसंबा, तालुका चिकोडी, जिल्हा बेळगांव येथील एक मोठे जमीनदार कै. रावसाहेब सातविराप्पा चनविराप्पा कराळे यांचे सुपुत्र श्री. मल्लिकार्जुन-आण्णा हे आपल्या पित्याचे सार्वजनिक कार्यातील धडे गिरवीत आहेत.

एका लक्ष्मीपुत्रानें स्वभावाची उदारता, देणग्यांचा ओघ व सदैव मनाची प्रसन्नता ठेवून व्यापार-धंदा-उद्योग यांत यशस्वी होत जावें हें खरें वाटण्याजोगें आहे कां, असा प्रश्न उपस्थित होईल.

एकसंबा गांवीं अंदाजें रु. ६०,००० किंमतीची इमारत देणगी देऊन चाललेले श्री. कराळेआण्णा यांचे वडिलांचे नांवचें हायस्कूल, सांगली येथील टेक्निकल इन्स्टिटयूटचें मार्गदर्शन, हें सर्व त्यांची शैक्षणिक आवड दाखवतील, तर सांगली शहरांत सार्व-जनिक संस्थेस श्री. कराळेअण्णा यांचें साहाय्य व मार्गदर्शन झालें नाहीं अशी एकहि संस्था दिसून येणार नाहीं. हा त्यांच्या उदार हस्ताचा परिपाक होय.

सांगलींतील काँग्रेस-भवन, पंडित नेहरू सत्कार-समिति, अशा दैनंदिन गरजेच्या सार्वजनिक हिताच्या संस्थांना ते स्वहस्तांनीं हातभार देत आलेच, पण इतरांकडूनहि त्यांनीं बरीच रक्कम गोळा करून दिली. सांगलींत वारंवार नदीपाण्याच्या-पुराच्या तडाख्यांत सांपडलेल्यांना अन्नवस्त्राचा पुरवठा करणें-करवणें हें त्यांचें वार्षिक कार्य ठरलेलेंच. तर पुर्णे-पूरग्रस्तांचे मदतीसाठी रु. ३५,००० रक्कम गोळा करून देशप्रदेशांतील आपल्या बांधवांना त्यांनीं मोठा आसरा दिलेला दिसून येईल.

सांगली येथें सन १९६० च्या डिसेंबर महिन्यांत त्यांनीं स्थापन केलेल्या जनता सहकारी बँक लि., सांगली या संस्थेच्या सन १९६२ जून अखेरचें भांडवल रुपये पावणेदोन लाख व व्यवहार बावीस लाखांवर नेण्याचें कसब श्री. कराळेआण्णा यांचा सहकारी तत्त्वावरील विश्वास व त्यांच्या सहकाऱ्यांची त्यांच्या-वरील अमाप श्रद्धा दाखवून देत नाहीं काय ?

श्री. कराळेआण्णा यांनीं सन १९५४-५८ या काळांत सांगली नगरपालिकेचे सदस्य आणि अध्यक्ष म्हणून काम केलें. यावेळच्या त्यांच्या कारकीर्दींत कॉलन्यासारख्या अनेक समस्या निर्माण झाल्या असतांना, कायदा, सहकाऱ्यांचें साहाय्य व विरोध आणि व्यवहारदृष्टि यांचा समन्वय कुशल वाटाड्याप्रमाणें करून एक आदर्श निर्माण केला होता. अद्याप त्यांच्या त्या कार्याची आठवण जनमनांत वसून आहे. याच कारकीर्दींत 'छत्रपति शिवाजी मंडई' बांधून तिचें उद्घाटन त्यांनीं करविलें आहे.

इतकें कार्य करतांना प्रत्यक्षांत स्वतःच्या खिशास काप मारण्याची त्यांची प्रवृत्ति प्रशंसनीय आहे. इतकें असूनहि सत्तेचा हव्यास नाहीं. मानाच्या जागेसाठी चढाओढ नाहीं, कीं प्रसिद्धीची हाव नाहीं. या दृष्टीनें श्री. कराळेआण्णांचेकडे सर्वांना आदरानेंच पाहावें लागतें.

औद्योगिक सहकारी सोसायट्या, ॲग्रिकल्चरल प्रोडयूस मार्केट कमिटी, सांगलीचे ते डायरेक्टर आहेत. गेल्या वर्षापर्यंत मार्केट यार्ड, सांगली कमिटीचे व्हाइस चेअरमन होते. सांगली टोबॅको मर्चन्टस् असोसिएशनचे ते सतत प्रेसिडेंट आहेत. चेंबर ऑफ कॉमर्सचेहि ते अध्यक्ष होते.

श्री. कराळे यांचें शिक्षण इंटरपर्यंत झालें आहे. इंग्रजीवर त्यांचें प्रभुत्व आहे. त्यांचे आवडते लेखक, कवि, यांच्या हिंदी, मराठी, इंग्रजी पुस्तकांचा संग्रह करण्याची त्यांची वृत्ति आहे, व हे सर्व व्यासंग ऐष-आराम-चैनींत कालापव्यय करण्यासारख्या सुखसोई उपलब्ध असतांना त्या टाकून प्रपंच आणि परमार्थ साधणारे श्री. कराळेआण्णा यांना वाढती लोकप्रियता मिळणारच व त्यापेक्षा जास्त कार्यें त्यांचे हातून घडत राहोत ही आशा ठेवणें योग्यच ठरेल.

## रेल्वेच्या वाहतूक करण्याच्या शक्तींत वाढ

रेल्वे बोर्डाच्या वाहतुक-समितीच्या एका सभासदानें मद्रास येथें चेंबर्स ऑफ कॉमर्सच्या प्रतिनिधींना असें सांगितलें कीं, रेल्वे मार्गांवर वाहतुकीसाठी करण्यांत येणारी मागणी आणि वाहतुकी-च्या सवलती ह्यांच्यामधील तफावत कमी करण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या मध्याच्या सुमारास रेल्वेवरील वाहतुकीच्या सोयीसवलती मागणीपेक्षा अधिक होण्याची शक्यता आहे. मानवी चुकांमुळें होणाऱ्या रेल्वेच्या अपघातांची संख्या कमी करण्याच्या उद्देशानें रेल्वेच्या नोकरांची एक मानसिक चांचणी प्रयोगादाखल सुरू करण्यांत येणार आहे. हा प्रयोग यशस्वी झाल्यास अशी चांचणी सर्व भारतीय रेल्वेवर सुरू करण्याचा विचार करण्यांत येईल.

## हॉटेलच्या धंद्यासाठी मदतनिधि

ऑल इंडिया हॉटेल्स अँड रेस्टॉरॉं कन्व्हेन्शनचें पांचवें अधि-वेशन श्रीनगर येथें मध्यवर्ती सरकारचे वाहतुक व दळणवळण मंत्री श्री. जगजीवनराम ह्यांच्या अध्यक्षत्वाखाली साजरें झालें. ह्या प्रसंगीं बोलतांना त्यांनीं परदेशी प्रवाशांना हॉटेल्सच्या मालकांनीं अधिक सोयी उपलब्ध करून द्याव्या असें सांगितलें. ते पुढें म्हणाले कीं, गेल्या १० वर्षांत भारतांत येणाऱ्या परदेशीय प्रवाशांची संख्या २१,००० वरून १,४०,००० पर्यंत वाढली आहे. त्याचप्रमाणें परदेशी प्रवाशांपासून मिळणाऱ्या परदेशीय हुंडणावळीची प्राप्ति १० कोटींवरून २० कोटींपर्यंत वाढली आहे. ह्या धंद्याला मदत करण्यासाठी १० कोटी रुपयांचा निधि स्थापन करण्याचा विचार सरकार करीत आहे. कारण हा धंदा परदेशीय हुंडणावळ देणाऱ्या धंद्यांपैकी एक महत्त्वाचा धंदा आहे.

## "लंडन शहर" पाहणी वर्गांत भारतीयाचा समावेश

### लंडनमधील आर्थिक संस्थांना भेटी देण्याची आकर्षक योजना

यंदाच्या "सिटी ऑफ लंडन" वर्गासाठी १९ देशांतील बँकांचे व विमा कंपन्यांचे ६० अधिकारी लंडनमध्यें आले आहेत. त्यांत बँक ऑफ बरोडाच्या लंडन शाखेतील एक अधिकारी श्री. जी. रंगनाथन् यांचाहि समावेश आहे.

हा वर्ग ब्रिटिश कौन्सिलनें योजिला असून तो २० मे पासून बारा दिवस चालणार आहे. लंडन शहरास भेट देऊन त्यांतील आर्थिक व द्रव्यविषयक व्यवहारांची उलाढाल करणाऱ्या संस्थांच्या कार्याची जवळून पाहणी करण्याची व माहिती मिळविण्याची संधि या वर्गांत भाग घेणाऱ्या अधिकाऱ्यांना मिळते. ब्रिटिश कौन्सिलनें आंखलेला हा वर्ग अत्यंत लोकप्रिय ठरला आहे. या वर्गांत अगोदर ५५ च जागा होत्या पण त्यासाठी यंदा शंभरपेक्षा जास्त अर्ज आले.

या बारा दिवसांत वर्गांतील अधिकारी बँक ऑफ इंग्लंडला भेट देऊन तेथील देशी व परदेशी व्यवहारांची माहिती मिळवितील. लंडनच्या स्टॉक एक्सचेंजची एका दिवसाची भेट हें या वर्गाचें मोठें वैशिष्ट्य आहे. इतिहासप्रसिद्ध लॉइडस् ऑफ लंडनलाहि भेट देण्याचा कार्यक्रम आहे.

ह्या वर्गाची आंखणी करण्याचें कामीं ब्रिटिश कौन्सिलला सहाय्य करण्यासाठीं शहरांतील संस्थांच्या प्रमुख सदस्यांची जी सल्लागार समिति स्थापण्यांत आली आहे, तिचे प्रमुख स्टॉक एक्सचेंजचे अध्यक्ष लॉर्ड रिची ऑफ डंडी हे आहेत.

---

### जनता सहकारी बँक लि., पुणें

अहवालाचे वर्षीं बँकेकडील ठेवी १५ लक्ष. ७७ हजार रु. च्या २१ लक्ष, १८ हजारांवर गेल्या. ९-५-१९६२ रोजीं बँकेची भोर शाखा सुरू करण्यांत आली. १८ मे, १९६२ रोजीं बँकेची मुख्य कचेरी स्वतःच्या वास्तूंत हलविण्यांत आली. बँकेनें पूरग्रस्त जनतेस एकूण १३० व्यक्तींना सुमारें ३ लक्ष रु. कर्ज दिलें. बँकेस १३,१५२ रु. नफा झाला. ( चेअरमन : गो. प्र. भागवत, वकील. मॅ. डायरेक्टर : द. शं. जमदग्नि )

दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९४५ ] फणसवाडी, मुंबई-४. [ टेलिफोन ७२१००

बचतीच्या आकर्षक योजना

| | |
|---|---|
| ( १ ) स्पेशल सेव्हिंग | व्याजाचा दर २॥ टक्के |
| ( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत | " ३। " |
| ( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें | " ५ " |

मुदतीच्या ठेवींच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.

मॅनेजर—ना. शं. कानिटकर




बेडेकर

मसाले, लोणचीं व पापड

आपल्या जेवणांत विशेष लज्जत आणतील.


वापरून पाहा.

दुगभाट, मुंबई ४.

शाखाः ठाकुरद्वार, दादर, कोट व परळ.

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES

Make doubly sure by fitting



MANUFACTURERS OF MACHINE SPARE PARTS & TOOLS

GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.